महाराष्ट्राचा मानबिंदू

# लोकमत

पृष्ठे : १२+४ = १६, किंमत : ₹ ४.00

सातारा, शुक्रवार, दि. ११ जानेवारी २०१९

# डी. पी. भोसले महाविद्यालयाचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोरेगाव :** शिवाजी विद्यापीठांतर्गत सातारा या ठिकाणी झालेल्या जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन महोत्सव स्पर्धेमध्ये सहा विभागांपैकी पाच विभागांत रयत शिक्षण संस्थेच्या डी. पी. भोसले कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. या विद्यार्थ्यांची विद्यापीठस्तरीय होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

मानव्यशास्त्र, मूलभूत विज्ञान, शेती आणि पशुसंवर्धन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वैद्यक व औषधशास्त्र आदी सहा विभागांत यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स सातारा येथे जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. मानवशास्त्र विभागात सिमरन इनामदार या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक, शेती आणि पशुसंवर्धन विभागात शुभम लवळे याने प्रथम क्रमांक, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागात अभिजित बर्गे याने द्वितीय क्रमांक, वैद्यक व औषधशास्त्र विभागात शाहीन इनामदार हिने द्वितीय क्रमांक तर स्नेहल घाडगे हिने मूलभूत विज्ञात विभागात तृतीय क्रमांकाचे यश संपादन केले आहे. कोल्हापूर येथे होणाऱ्या विद्यापीठस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सव स्पर्धेसाठी या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव